

# ऐतिहासिक

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा.
दा. क्र. ५७८७



IRBK-0105767
IRBK-0105767

५७६७

संस्कृत
साहित्य
सरिता
: २६

भास-कृत

# अविमारक

20090

कथासार
अमरेन्द्र



वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स

IRBK-0105767

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

# परिचय

भासाच्या तेरा नाटकांत 'अविमारक' हें एक अगदीं वेगळ्या प्रकारचें नाटक आहे. विद्वानांच्या मताप्रमाणें 'बृहत्कथे'तील एका कथानकावर या नाटकाची उभारणी झालेली असली तरी नाटककाराचा कल्पनाविलासहि त्यांत भरपूर पाहावयास सांपडतो. 'चारुदत्त' नाटकांत भासानें जसें तत्कालीन सर्वसामान्य समाजस्थितीचें चित्र रेखाटलें आहे तसें त्यानें 'अविमारकां'त राजमहालांतील राजे लोकांच्या स्वच्छंद वर्तनाचें चित्र रेखाटलेलें दिसतें. कुंतिभोज, सौवीरराज, काशिराज हे 'अविमारकां'त वर्णिलेले राजे ऐतिहासिक होते किंवा काय हा वादाचा विषय म्हणून क्षणभर बाजूला ठेवला तरी त्यांच्या त्या नाटकांत वर्णिलेल्या चरित्रावरून व चारित्र्यावरून तत्कालीन राजेलोकांच्या खाजगी वर्तनाचें कल्पनाचित्र रेखाटणें अशक्य वाटत नाहीं. आणि तें सांस्कृतिकदृष्ट्या फारच खालच्या दर्जाचें होतें हें मान्य करण्यावांचून गत्यंतरहि दिसत नाहीं.

भास जितका वास्तवदर्शी तितकाच आदर्शवादी नाटककार आहे. त्यामुळेंहि 'अविमारक' हें नाटक त्यानें केवळ गंमतीनें, मनोरंजनासाठीं लिहिलें असेल असें वाटत नाहीं.

'अविमारकां'त कुंतिभोज, सौवीरराज व काशिराज अशीं मुख्य नांवें आलेलीं आहेत. त्यांपैकीं कुंतिभोज हा प्रदेश कनोजच्या दक्षिणेस आणि सौवीर हा सिंध व काठेवाड यांच्या दरम्यान असल्याचें संशोधकांचें म्हणणें आहे.

—लेखक

# अविमारक

२०९७०
काठवाङ्मय
७२८
२५।१२।५६

चर्मण्वती (चंबळा) नदीच्या तीरावरील कुंतिभोज देशांत कुंतिभोज राजा राज्य करीत होता. कुंतिभोजाला कुरंगी नांवाची एक अति सुंदर कन्या होती आणि ती उपवर झाली होती. देशोदेशींचे राजे तिला मागणी घालण्यासाठीं आपले दूत कुंतिभोजाकडे पाठवीत होते. परंतु कुरंगी कोणाला द्यावयाची यासंबंधीं त्याचा कांहीं निश्चय होत नव्हता.

काशिराज व सौवीरराज यांनींहि आपापल्या मुलांसाठीं कुरंगीला मागणी घातली होती. काशिराजाचा दूत आला होता त्याला काय उत्तर द्यावयाचें असा तांतडीचा प्रश्न होता. वास्तविक काशिराज व सौवीरराज दोघेहि राजाचे मेहुणेच. तथापि सौवीरचा राजा हा कुंतिभोजाच्या पट्ट-राणीचा भाऊ होता. त्यामुळे साहजिकच सौवीर-राजपुत्र विष्णुसेन याला कुरंगी देण्याविषयीं राजाराणींच्या मनांत निश्चय होत होता. परंतु सौवीरराजाकडून कुरंगीला मागणी घालण्याकरितां एकदां दूत आला होता; तेव्हां मुलीचें वय अजून लहान असल्याची सबब सांगून त्याला कुंतिभोजानें परतविलें होतें. त्यानंतर सौवीरराजाकडून पुन्हां कोणीच त्या कामासाठीं कुंतिभोजाकडे आलेलें नव्हतें.

# प रि च य

भासाच्या तेरा नाटकांत 'अविमारक' हें एक अगदीं वेगळ्या प्रकारचें नाटक आहे. विद्वानांच्या मताप्रमाणें 'बृहत्कथे'तील एका कथानकावर या नाटकाची उभारणी झालेली असली तरी नाटककाराचा कल्पनाविलासहि त्यांत भरपूर पाहावयास सांपडतो. 'चारुदत्त' नाटकांत भासानें जसें तत्कालीन सर्वसामान्य समाजस्थितीचें चित्र रेखाटलें आहे तसें त्यानें 'अविमारकां'त राजमहालांतील राजे लोकांच्या स्वच्छंद वर्तनाचें चित्र रेखाटलेलें दिसतें. कुंतिभोज, सौवीरराज, काशिराज हे 'अविमारकां'त वर्णिलेले राजे ऐतिहासिक होते किंवा काय हा वादाचा विषय म्हणून क्षणभर बाजूला ठेवला तरी त्यांच्या त्या नाटकांत वर्णिलेल्या चरित्रावरून व चारित्र्यावरून तत्कालीन राजेलोकांच्या खाजगी वर्तनाचें कल्पनाचित्र रेखाटणें अशक्य वाटत नाहीं. आणि तें सांस्कृतिकदृष्ट्या फारच खालच्या दर्जाचें होतें हें मान्य करण्यावांचून गत्यंतरहि दिसत नाहीं.

भास जितका वास्तवदर्शी तितकाच आदर्शवादी नाटककार आहे. त्यामुळेंहि 'अविमारक' हें नाटक त्यानें केवळ गंमतीनें, मनोरंजनासाठीं लिहिलें असेल असें वाटत नाहीं.

'अविमारकां'त कुंतिभोज, सौवीरराज व काशिराज अशीं मुख्य नांवें आलेलीं आहेत. त्यांपैकीं कुंतिभोज हा प्रदेश कनोजच्या दक्षिणेस आणि सौवीर हा सिंध व काठेवाड यांच्या दरम्यान असल्याचें संशोधकांचें म्हणणें आहे.

—लेखक

२०९७०
ग्रंथालय
७२८
२५।७।२४

# अविमारक

चर्मण्वती (चंबळा) नदीच्या तीरावरील कुंतिभोज देशांत कुंतिभोज राजा राज्य करीत होता. कुंतिभोजाला कुरंगी नांवाची एक अति सुंदर कन्या होती आणि ती उपवर झाली होती. देशोदेशींचे राजे तिला मागणी घालण्यासाठीं आपले दूत कुंतिभोजाकडे पाठवीत होते. परंतु कुरंगी कोणाला द्यावयाची यासंबंधीं त्याचा कांहीं निश्चय होत नव्हता.

काशिराज व सौवीरराज यांनींहि आपापल्या मुलांसाठीं कुरंगीला मागणी घातली होती. काशिराजाचा दूत आला होता त्याला काय उत्तर द्यावयाचें असा तांतडीचा प्रश्न होता. वास्तविक काशिराज व सौवीरराज दोघेहि राजाचे मेहुणेच. तथापि सौवीरचा राजा हा कुंतिभोजाच्या पट्ट-राणीचा भाऊ होता. त्यामुळें साहजिकच सौवीर-राजपुत्र विष्णुसेन याला कुरंगी देण्याविषयीं राजाराणींच्या मनांत निश्चय होत होता. परंतु सौवीरराजाकडून कुरंगीला मागणी घालण्याकरितां एकदां दूत आला होता; तेव्हां मुलीचें वय अजून लहान असल्याची सबब सांगून त्याला कुंतिभोजानें परतविलें होतें. त्यानंतर सौवीरराजाकडून पुन्हां कोणीच त्या कामासाठीं कुंतिभोजाकडे आलेलें नव्हतें.

कुंतिभोज या गोष्टीचें नवल करीत होता. त्याचा अमात्य भूतिक हा मोठा चाणाक्ष असून त्याला याबाबतींत कांहींतरी काळें बेरें असावें अशी शंका येत होती. आणि त्या दृष्टीनें त्याचा तपासहि चालू होता. त्याच्या हेंरांकरवीं त्याला असें समजलें होतें कीं, स्वतः राजा किंवा त्याचा मुलगा विष्णुसेना यांपैकीं कोणीच राजधानींत दिसत नाहींत. सारा राज्यकारभार मंत्रीच चालवीत आहेत. याचें कारण जरी कांहीं कळत नसलें तरी राजवाड्यांत प्रवेश मात्र कोंणालाहि मिळत नाहीं.

राजाला जेव्हां ही हकीकत समजली तेव्हां त्याच्या पोटांत निराळीच भीति उभी राहिली. त्यानें ती बोलूनहि दाखविली. " सौवीरराज विलासांत रममाण झाल्यामुळें त्याच्या दुष्टबुद्धीच्या मंत्र्यांनीं त्याला कैदेंत तर टाकलें नसेल ? कीं तो एखाद्या रोगानें अत्यवस्थ असल्यामुळें त्याचे आप्तेष्ट त्याची भेट कोणाला घेऊं देत नाहींत ? कीं कोणा ब्राह्मणाचा कांहीं शाप झाल्यामुळें त्याच्या शांतीसाठीं त्यानें एकान्तांत बसून एखादें अनुष्ठान आरंभिलें आहे किंवा काय ? एरवीं राजवाड्यांत कोंडून घेण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तेव्हां या बाबतींत खरोखर काय वस्तुस्थिति आहे त्याचा त्वरित तपास करा, " असें राजानें आपल्या अमात्याला सांगितलें.

एक दिवस राजकन्या कुरंगी उद्यानांत खेळावयास गेली होती. त्याच दिवशीं अकस्मात तेथें असलेला अंजनगिरी नांवाचा हत्ती पिसाळला. त्याच्या गंडस्थळांतून सारखा मद स्रवत होता. भडकल्याबरोबर प्रथम त्यानें माहुताला खालीं आणून ठार मारलें. त्याला आवरणारा कोणी नसल्यामुळें तो एकदम भयंकर वेगानें पळत सुटला. त्याचा रोख नेमका राजकन्या जेथें आपल्या सख्यांसह खेळत-बागडत होती तिकडेच दिसला. आसपासचे लोक तें दृश्य पाहून सैरावैरा पळत सुटले. स्त्रिया बिचाऱ्या आरडाओरड करण्याशिवाय दुसरें काय करणार ? जे सद्‌गृहस्थ निवाऱ्याला म्हणून तेथें आलें होते ते निष्कारणच या अनर्थाला बळी पडले. कुंतिभोजाचा अमात्य कौंजायन याच्याकडे कुरंगीच्या रक्षणाचीं व्यवस्था होती. त्यामुळें तो तेथेंच होता. तो स्वतः वांचला खरा पण मोठ्याच शिकस्तीनें. उद्यानांतील सामानसुमानाची पाहणी करण्यांत तो जरा गुंतला होता तोंच तो हत्तीं राजकन्येच्या वाहनाजवळ एकदम येऊन उभा राहिला.

परंतु तेवढ्यांत कोणी एक नवखाच तरुण तेथें आला व त्यानें हत्ती राजकन्येवर चालून येत असलेला पाहातांच अगदीं अकल्पित रीतीनें त्या हत्तीवर चाल केली. ‘ तुम्ही मुळींच घाबरूं नका ’ असें म्हणून राजकन्येला त्यानें

धीर दिला ! तो युवक दिसायला अतिशय देखणा असून गर्विष्ठ मात्र मुळींच नव्हता. तो शूर होता तरी सभ्यपणानें वागत होता आणि नाजुक दिसत असला तरी चांगला बळकट होता. त्यानें नुसत्या आपल्या हातानेंच त्या हत्तीच्या तोंडावर लागोपाठ तडाखे लगावण्यास सुरुवात केल्यामुळें तो हत्ती अधिकच चिडला आणि तोंड फिरवून त्यानें आपला मोर्चा या तरुणाकडेच वळवला. परंतु त्याचें त्या तरुणाला कांहींच वाटलें नाहीं. अगदीं सहजपणानें त्या हत्तीला हुलकावण्या दाखवीत तो त्याला खेळवूं लागला. लोकांनीं त्याच्या या पराक्रमाचें कौतुक केलें. परंतु त्या कौतुकामुळें तो संकोचला आणि वरहि न पाहातां अगदीं निमूटपणानें आपल्या घराकडे निघून गेला.

त्याच वेळीं राजाचा दुसरा अमात्य भूतिकहि तेथें आला. त्याला या माणसाविषयीं मोठें कुतूहल उत्पन्न झालें. कारण अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसतांना एकाएकीं त्या अनोळखीं तरुणानें राजकुमारीसाठीं स्वतःच जीव धोक्यांत घालावा, याचें त्याला नवल वाटत होतें. त्यामुळें राजकन्येला कौंजायनाच्या स्वाधीन केल्यावर व तिची सुरक्षितपणें राजवाड्याकडे रवानगी करून दिल्यावर भूतिक त्या पराक्रमी तरुणाच्या तपासाला लागला.

तो त्याची चवकशी करीत त्याच्या राहण्याच्या

जागेपर्यंत गेला. त्याचें रूप देवांसारखें सुंदर होतें, वाणीहि ब्राह्मणाप्रमाणें शुद्ध होती आणि त्याची कांती क्षत्रिय-कुलाला शोभण्यासारखी तेजस्वी असून शरीर दिसायला नाजुक असलें तरी चांगलें धष्टपुष्ट व सुडौल होतें. परंतु तो तरुण स्वतःची जात सांगत होता ती मात्र अंत्यज किंवा चांडाळ म्हणून. परंतु भूतिकाला त्या तरुणाच्या लक्षणांवरून तरी तें मुळींच पटलें नाहीं. वास्तविक दुसरा अमात्य कौंजायन यालाहि तशीच शंका आली होती. कोणत्या तरी कारणानें हा स्वतःचा वृत्तान्त लपवून ठेवीत असला पाहिजे, असें त्यालाहि वाटत होतें. भूतिकानें त्या तरुणाला जवळून पाहातांच त्याची याविषयीं खात्री होऊन चुकली.

अधिक माहिती मिळवावी म्हणून भूतिकानें कांहींतरी निमित्त काढून त्या तरुणाच्या वडिलांचीहि भेट घेतली. त्या पुरुषाचें राजतेज तर ढगांआड दडलेल्या सूर्याच्या प्रकाशकिरणांप्रमाणें स्पष्ट ओळखूं येत होतें. तोहि वेष पालटूनच राहात होता. तरीपण त्याची व्यायामाच्या योगानें चांगली भरदार दिसणारी छाती आणि धनु-ष्याच्या दोरीनें खांद्यावर पडलेले घट्टे कांहीं लपत नव्हते. त्याशिवाय त्या तरुणाच्या बाबतींत भूतिकाला असेंहि कळलें कीं, अद्याप त्याचें लग्न झालेलें नाहीं.

सौवीरराजासंबंधींचें रहस्य समजून घेण्यासाठीं कुंतिभोज जितका उत्सुक होता, तितकीच त्याला त्या तरुणाचें कोडें उलगडून घेण्याचीहि उत्कंठ होती. म्हणून त्यानें त्याप्रमाणें चवकशी करण्याची आज्ञा आपल्या अमात्यांना दिली. आणि तो स्वतः राजकन्येच्या लग्नाबाबतींत कांहींतरी निश्चित करण्याच्या मागें लागला.

याच वेळीं कुंतिभोजाच्या नगरींतीत एका घरांत एक निराळाच प्रकार चालू होता. एके ठिकाणीं एक प्रणयी तरुण विरहानें नुसता तळमळत पडला होता.

त्या दिवशीं उद्यानांत भडकलेंल्या हत्तीपासून राजकन्येला वांचविणारा तो तरुण येथेंच राहात होता. त्याचें नांव होतें अविमारक. हा खरा सौवीर-राजपुत्र विष्णुसेन होता. तो लहान असतांना एकदां धूमकेतु नांवाचा राक्षस उन्मत्त होऊन सौवीर देशावर चालून आला. त्यावेळीं कुमाराचें वय फार लहान होतें. तो आपल्या बरोबरीच्या सवंगड्यांसह धुळींत खेळत होता. तेवढ्यांत रक्षकांचा डोळा चुकवून तो धूमकेतु नेमका त्या कुमाराजवळच येऊन पोहोंचला. त्याला वाटलें कीं 'लुसलुशीत मांसाची ही चांगलीच मेजवानी आपल्याला मिळणार!' या विचारानें तो विष्णुसेनावर झडप घालावयास पुढें सरसावला. तोंच वज्रानें जसें

२०९७० वाळवाङ्मय ७२८

एकाद्या मोठ्या पर्वताचें चूर्ण करावें किंवा वणव्यानें एकादें अरण्य जाळून खाक करावें त्याप्रमाणें त्या राजकुमारानें हातांत कसलेंहि शस्त्र न घेतांच त्या दुष्ट राक्षसाला ठार मारलें. तेव्हांपासून विष्णुसेनाचें नांव 'अविमारक' असें पडलें.

अविमारकाला आपलें राज्य व देश सोडून कुंतिभोजाच्या नगरींत येऊन राहावें लागलें त्यालाहि तसेंच कारण होतें. स्वत: अविमारक, त्याचा पिता सौवीरराज व त्याची आई सुचेतना हीं तिघेंहि तेथें येऊन वेष पालटून राहात होतीं. दुर्दैवानें त्यांना स्वत:ला चांडाळ म्हणवून घ्यावें लागत होतें. त्यांच्यावरील या चमत्कारिक आपत्तीचें कारण एका ऋषीचा शाप होता.

एकदां चण्डभार्गव नांवाचा एक ब्रह्मर्षि आपल्या शिष्यांसह हिंडत हिंडत सौवीरदेशांत आला. हा ऋषि भयंकर तापट होता; पण तपश्चर्येचें सामर्थ्यहि त्याच्यापाशीं तसेंच दांडगें होतें. चण्डभार्गव अरण्यांतून प्रवास करीत असतांना त्याच्या एका शिष्याला एका वाघानें मटकावलें. त्यामुळें चण्डभार्गव संतापला आणि त्यानें त्या वाघाचा राग बिचाऱ्या सौवीरराजावरच काढला. योगायोगानें सौवीरराज त्याच वेळीं शिकार करत करत त्या टिकाणीं येऊन पोहोंचला. त्याच्याकडे पाहून तो ब्रह्मर्षी त्याला अद्वातद्वा

बोलूं लागला. अर्थात राजाला त्याचें कांहीं कारण माहीत नव्हतें. त्यामुळें राजालाहि त्या ऋषीच्या अविचारीपणाची चीड येऊन त्यानें उलट रागावून त्याला विचारलें, " मला तुम्ही वाटेल तसें बोलतां आहांत पण तुमच्या रागाचें कारण मात्र कांहींच सांगत नाहींत. इतका रागीट माणूस खरोखरी तपाचरण करायलाहि योग्य नाहीं. तुम्हीं ब्राह्मणाचा वेष घेतला आहेत खरा पण मला तर तुम्ही चांडाळ वाटतां !"

मग काय विचारतां ! तो कोपिष्ठ ऋषी रागानें नुसता लाल होऊन गेला. अग्नींत तूप पडावें तसा भडकून तो ओरडला, " ज्याअर्थी मी ब्रह्मर्षीमध्यें श्रेष्ठ असतांनाहि तूं मला चांडाळ म्हटलें आहेस, त्याअर्थी तूं आपल्या बायकामुलांसह स्वतःच चांडाळ होशील."

चण्डभार्गव ऋषीनें दिलेला तो शाप ऐकून सौवीरराज अगदीं गडबडून गेला. त्याचें नशीब इतकेंच कीं तो संतापी ब्रह्मर्षी त्याला नुसता 'चांडाळ होशील' असा शाप देऊनच थांबला, नाहींतर तो खरा त्याच्या शापानें भस्मसातच होऊन जावयाचा ! तरीपण मिळालेला शापहि कांहीं कमी तापदायक नव्हता. त्यामुळें सौवीरराजानें त्या ब्रह्मर्षीला शरण जाऊन त्याची करुणा भाकली. तेव्हां तो ऋषिहि हळुहळु शांत झाला आणि त्यानें उःशाप

सांगितला कीं, या शापांत तुला फक्त एक वर्षभरच राहावें लागेल.

चण्डभार्गवाचें तप:सामर्थ्य फार मोठें असल्यामुळें त्याचा शाप खरा होण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. त्यामुळें सौवीरचा राजा आपला मुलगा विष्णुसेन व पत्नी सुचेतना यांच्यासह आपले शापकाळांतले दिवस घालविण्यासाठीं कुंतिभोज नगरींत येऊन गुप्तपणानें राहूं लागला. त्या काळांतच एक दिवस उद्यानांतील तो प्रसंग घडून आला; आणि त्या दिवसापासून अविमारकाचें अंत:करण मात्र अतिशय अस्वस्थ होऊन गेलें. हत्तीच्या हल्ल्याच्या त्या गडबडींत कुरंगी अविमारकाच्या चुटपुटतीच दृष्टीला पडली पण तेवढ्यांतच तिनें त्याचें अंत:करण आकृष्ट करून घेतलें. त्या दिवसापासून त्याला कांहीं सुचेनासें झालें. कधीं पाहावें तेव्हां तो आपला कुरंगीसंबंधींच्याच विचारांत गढून गेलेला दिसावयाचा. त्याचा मित्र विदूषक याच्याशीं बोलण्यांतहि त्याचें मन रमेना.

वास्तविक अविमारक जरी मूळ राजघराण्यांतला असला तरी यावेळीं तो चांडाळ म्हणूनच जगत होता. असें असतांना श्रेष्ठ कुळांतील राजकन्येचा लोभ त्यानें धरावा हें मोठें विचित्रच होतें. पण प्रेमांत सांपडलेल्यांना असल्या सारासार विचाराचें काय होय !

कुरंगी जेव्हां अविमारकाच्या प्रथम दृष्टीला पडली तेव्हां, ती हत्तीनें आपल्या सोंडेंतून उडविलेल्या पाण्याच्या फवाऱ्यामुळें भिजून ओलीचिंब झालेली होती. घाबरून गेल्यामुळें ती व्याकुळ झालेली दिसत होती आणि तिच्या दृष्टींत खिन्नताहि होती. कुरंगीची तीच मूर्ति अविमारक मनोमनीं वागवीत होता व तीच त्याला स्वप्नांतहि दिसत होती. तिच्याशिवाय दुसरें कोणीहि त्याला डोळ्यासमोर नकोसें झालें होतें. त्याच्या मनांतील या विरहदु:खाचा परिणाम त्याच्या शरीरावरहि झालेला होता. त्याचा चेहरा निस्तेज पांढरट दिसूं लागला आणि शरीरानें तो खंगतहि चालला. दिवसभर आपल्या प्रियेसाठीं दु:ख करीत बसावें आणि रात्रीं तिच्या विरहानें तळमळत पडावें असा त्याचा उपक्रम सुरू झाला.

आपली ही अशी अवस्था होणें बरोबर नाहीं, हा अधीरपणा आपल्यासारख्या पुरुषाला शोभत नाहीं हें त्याला स्वत:लाहि समजत होतें. पण त्याला आपलें मन आवरतां येत नव्हतें. तेव्हां त्यानें अखेर मन आवरण्याचा नाद सोडून दिला व तो कुरंगीच्याच रूपगुणांचें चिंतन करूं लागला. त्याचा मित्र विदूषक संतुष्ट याला त्याची ही व्याकुळ मन:स्थिति समजून आलेली होती. त्यामुळें त्याला दिलासा द्यावा म्हणून तो त्याच्या भेटीसाठीं आला. परंतु तत्पूर्वीच कुरंगीच्या दासींनीं येऊन अविमारकाची भेट घेतली होती.

अविमारकाची इकडे ही अशी स्थिति झाली होती, तशीच तिकडे कुरंगीचीहि अवस्था मोठी विलक्षण होऊन गेली होती. उद्यानांतल्या त्या प्रसंगापासून ती उदास बनली होती. साजशृंगार तर तिला नकोसेच झाले, इतकेंच काय खाणेंपिणेंहि तिला नकोसें वाटूं लागलें. आपल्या सख्यांशीं ती बोलत असली तर त्यांत पूर्वीसारखें तिचें मन नसे. कधीं उसासे टाकीत बसावें, तर कधीं उगीचच हंसावें, कधीं एका बाजूला जाऊन रडत बसावें तर कधीं कांहींतरी असंबद्ध बडबडच करीत बसावें. अशी वेड्या-सारखी तिची स्थिति होऊन गेली. तशी ती तोंडानें सांगे कीं आपल्याला बरें वाटत नाहीं. ती पांढरीफटक पडत चालली होती आणि वाळतहि चालली होती. इतकें झालें तरी आपली अशी अवस्था होण्याचें खरें कारण मात्र ती कोणाजवळच सांगेना. दासींना यांत कांहीं तरी रहस्य असल्याची शंका येऊं लागली होती. त्यांनीं तिच्याकडून हळुहळु सारें कांहीं काढून घेतलें. कुरंगीचें मन तिला त्या प्राणावरच्या प्रसंगांतून सोडविणाऱ्या देखण्या तरुणावर गेलें होतें; आणि त्याच्यासाठींच ती झुरत होती. पण ती ज्याच्यासाठीं झुरणीला लागली होती तो तिला कसा मिळणार?

त्या उद्यानांतल्या आणीबाणीच्या प्रसंगीं पुढें सरसा-वलेला तो तरुण उच्च कुळांतील नाहीं, ही गोष्ट त्या

दासींनाहि माहीत झाली होती. परंतु त्यांचाहि विश्वास त्या गोष्टीवर बसत नव्हता. तो खरोखरी हीन कुळांतला नसून कांहीं तरी कारणानें तो आपलें खरें कुळ लपवीत असला पाहिजे, असें त्यांनाहि वाटूं लागलें. धात्री व नलनिका या दोघी कुरंगीच्या दासी याप्रमाणें विचार करीत असतांनाच त्यांना आकाशवाणी ऐकूं आली कीं, 'याचें रूप, शहाणपण, सौजन्य आणि एकंदर प्रभाव हीं हीनकुळांत उत्पन्न झालेल्या माणसाच्या ठिकाणीं असणें शक्य नाहीं. योग्य वेळीं याच्या कुळाची माहिती तुला कळून येईल. तेव्हां आतां तूं तुझ्या मनांतील त्याच्या कुळाविषयींची शंका काढून टाकून आपलें काम तडीला ने.'

या आकाशवाणीमुळें तर दासींच्या मनांतील उरला सुरला संशय नाहींसा झाला आणि त्या आपल्या मालकिणीच्या मनांतील हेतु कसा सिद्धीला जाईल याच्या मागें लागल्या. कारण कुरंगीचें मन ज्याच्यावर गेलें आहे तो कुरंगीचें प्रेम स्वीकारील कीं नाहीं हें अजून कळावयाचेंच होतें.

त्यासाठीं पहिली गोष्ट म्हणजे त्या तरुणाचें राहण्याचें ठिकाण हुडकून काढणें. त्याप्रमाणें त्या दोघीजणी लवकरच अविमारक राहात होता त्या ठिकाणीं येऊन पोहोंचल्या.

त्यांनीं पाहिलें तों हे राजश्रीहि आपल्या मालकिणीचें वेड लागल्यामुळें बडबडत आहेत. त्या दोघींपैकीं धात्री नांवाची कुरंगीची जी दायी होती तिनें पुढें होऊन अविमारकाला ‘ कसें काय बरें आहे ना ? ’ म्हणून विचारलेंहि. तरीपण ही स्वारी कुठली शुद्धीवर यायला ! ‘ अहाहा, काय तिची रूपसंपदा ! तिच्या मुखाकडे पाहतांच डोळ्यांना कसें बरें वाटतें ! ’ तो आपला आपल्या तंद्रींत बडबडतच होता. त्याला आपल्याकडे कोणी आल्याची चाहूलहि लागली नाहीं. परंतु यामुळें धात्री व तिच्याबरोबर असलेली नलनिका या दोघींनाहि कळून चुकलें कीं हा पुरुष आपल्या मालकिणीच्या म्हणजे कुरंगीच्याच प्रेमानें वेडापिसा झालेला आहे. अर्थातच त्या ज्या कामासाठी तेथवर आल्या होत्या तें आतां झाल्यासारखेंच होतें.

धात्रीनें पुन्हां खांकरून खोकरून आपण आल्याची जाणीव दिली आणि ‘ आपलें कुशल आहे ना ’ असा पुन्हां प्रश्न केला. तेव्हां मात्र अविमारक भानावर आला आणि शरमलाहि. त्याला त्या दोघीजणी कोण आहेत हें माहीत नव्हतें. त्यामुळें त्यांनीं जेव्हां विचारलें कीं “ काय चाललें आहे ? ” तेव्हां त्यानें उत्तर दिलें, “ योगशास्त्राचें चिंतन. ” पण ही लपवालपवी आतां मुळींच टिकण्यासारखी नव्हती. त्यामुळें धात्रीनें हंसून म्हटलें, “ ठीक

आहे. आपण येथें योगाचें चिंतन करीत आहांत त्यापेक्षां तें राजवाड्यांत येऊन निवान्तपणें करीत बसा. कारण तेथें आपल्यापेक्षांहि अधिक तीव्रतेनें एक माणूस असें चिंतन करीत बसलें आहे ! "

हळुहळु धात्रीनें आपला येण्याचा उद्देश सांगितला. राजकन्या कुरंगीहि आपल्यासाठीं झुरत आहे हें ऐकून अविमारकाला अतिशय आनंद झाला. लगेच धात्रीनें त्याच्याशीं बोलणें करून ठरविलें कीं त्याच दिवशीं त्यानें राजवाड्यांतील कन्यामहालांत यावें.

कन्यामहालाच्या रक्षणाची व्यवस्था अमात्य भूतिक याच्याकडे होती. या भूतिकाला राजानें नुकताच काशि-राजाकडून आलेल्या दूताबरोबर काशिराजाकडे पाठवून दिलें होतें. काशिराजानें दूत पाठवून आपला मुलगा जय-वर्मा याच्यासाठीं कुरंगीला मागणी घातली होती. सौवीर राजपुत्राला कुरंगी देण्याचें कुंतिभोजाच्या मनांत असूनहि सौवीरराजाचा किंवा त्याच्या मुलाचाहि कोठें पत्ता लागत नसल्यामुळें कुंतिभोजानें अखेर कुरंगी जयवर्म्याला द्याव-याचें ठरविलें होतें. आणि यावेळीं त्यानें भूतिकाला या कामगिरीवर काशिराज्यांत पाठविलें होतें. भावी जांवई जयवर्मा व त्याची आई सुदर्शना हिला आपल्याबरोबरच

घेऊन ये असें राजानें भूतिकाला सांगितलें होतें. त्यामुळें भूतिक इतक्यांत नगरांत परतण्याची शक्यता नव्हती.

याच संधीचा फायदा घेऊन अविमारकानें आजपासूनच कन्यामहालांत येऊन राहावें असें धात्रीनें सुचविलें. कारण एकदां कन्यामहालांत अविमारकाचा शिरकाव् झाला म्हणजे मग त्याला कोणाची भीति नाहीं, अशी तिची खात्री होती.

त्या बेताला अविमारकानें तत्काळ संमतीहि दिली. त्यानें राजवाड्याची रचना एकदां धात्रीकडून सर्व समजावून घेतली. आणि मध्यरात्रीची वेळ राजवाड्यांत प्रवेश करण्यासाठीं म्हणून निश्चित केली.

धात्री व नलनिका याप्रमाणें सर्व ठरवून परत गेल्यावर अविमारकाचा मित्र विदूषक तेथें आला. त्याला अविमारकानें हा सर्व बेत मोठ्या आनंदानें सांगितला. तेव्हां विदूषक म्हणाला, " वेळ आहे, प्रसंग आहे एकाशीं दुसरा असलेला बरा. तेव्हां मीहि तुझ्याबरोबर येतों. " परंतु त्याचें हें म्हणणें अविमारकानें खोडून काढलें व त्याच्याऐवजीं त्याचा आशीर्वाद मात्र घेऊन अविमारकाची स्वारी आपल्या प्रणय-कामगिरीवर निघाली.

काशिराजाचा मुलगा जयवर्मा याच्याशीं कुरंगीचा विवाह राजाराणींनीं नक्कीहि करून टाकला होता. परंतु कुरंगीला मात्र तें मुळींच पसंत नव्हतें. दासींच्या तोंडून तिला जेव्हां तें कळलें तेव्हां ती फणकाऱ्यानें म्हणाली, " माझी मी स्वतंत्र आहें. मला हें मुळींच पसंत नाहीं. "

कुरंगी त्याच विचारांत असतांना तिचा डोळा लागला. तेव्हां तिच्या दासी ठरल्याप्रमाणें अविमारकाची वाट पाहात बसल्या.

अविमारक रात्र पडतांच दबकत दबकत राजवाड्यापाशीं आला. त्याच्या हातांत तलवार होती व एक भक्कम दोरखंडहि त्यानें बरोबर घेतलें होतें. त्याचा वेष एखाद्या चोरी करावयास निघालेल्या घोरासारखाच दिसत होता. रस्त्यानें येतांना त्यानें घराघरांतून स्त्रीपुरुषांचे प्रेमळ संवाद ऐकले, कोठें गाणें चाललें होतें तें ऐकलें, त्याच्यासारखेच कांहीं विरहानें वेडे झालेले समदुःखी पाहिले. चोराचिलटांना आणि गस्तवाल्यांना टाळीत टाळीत अखेर तो राजवाड्याच्या तटापाशीं येऊन उभा राहिला. तेथून त्यानें आपल्या बरोबरचा दोर वाड्याच्या कपिशिखरावर टाकला तो पहिल्याच खेपेला तेथें चांगला पक्का जाऊन बसला. वाड्याचा तट चांगलाच उंच आणि भक्कमहि होता. तरीपण दोराचा आधार मिळाल्यामुळें अविमारक

तो सरसर चढून गेला. आणि तसाच वाड्याच्या आंतल्या बाजूला खालींहि उतरला. लगेच त्यानें तो दोर कापून घेऊन हत्तीखान्यांत टाकून दिला आणि तो आपला मार्ग न्याहाळूं लागला.

कुंतिभोजाचें अपार वैभव त्या राजवाड्यांत स्पष्ट दिसत होतें. तें पाहून तो राजकुमारहि चकीत झाला. त्यानें आसपास पाहिलें तों धात्रीनें सांगितलेल्या सर्व खुणा त्याला तेथें आढळून आल्या. पलीकडेच असलेला कन्या-महालहि त्यानें लगेच ओळखला. तो चढून जावयाला अगदीं सोपा असल्यामुळें अविमारक त्यावर झपाझप चढून गेला आणि जाळी मोडून त्यानें आंत प्रवेश केला.

अविमारकाची तेथें कुरंगीशीं भेट झाली व तीं दोघें मोठ्या आनंदांत तेथें राहूं लागलीं.

पुष्कळ दिवस एकमेकांच्या सुखांत गेले. परंतु पुढें कुरंगीचें हें गुपित फुटून अविमारकाला कन्यामहाल सोडून निघून जावें लागलें.

तेथून तो बाहेर पडला तो विरहदु:खानें जळतच. त्याला आपल्या प्रियेचा विरह अधिक सहन करणें शक्य नाहीं असें दिसून आलें तेव्हां त्यानें तळ्यांत उडी टाकून जीव देण्याचा विचार केला. पण अशा प्रकारें आत्महत्या करणें

हे धर्माला सोडून असल्यामुळें त्यानें तो विचार रद्द केला आणि अरण्यांत पेटलेल्या वणव्यांत प्रवेश करण्याचें ठरविलें. वणव्यापाशीं जाऊन त्यानें अग्निदेवाला नमस्कार केला व म्हटलें कीं, ‘ जिचें मी चिंतन करीत आहें तीच कुरंगी मला परलोकांतहि पत्नी म्हणून लाभो. ’ आणि असें म्हणून त्यानें त्या आगींत उडी टाकली. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याला त्या आगीची झळहि लागली नाहीं, मग आगींत जळून मरण्याचें तर दूरच ! अविमारकालाहि या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. परंतु खरें म्हणजे ती गोष्ट अगदीं साहजिक होती. अविमारक हा अग्नीच्या प्रभावानें उत्पन्न झालेला म्हणजे खरा अग्नीचा पुत्र होता. पिता आपल्या पुत्राला कसा जाळील ! त्यामुळें तो त्या भयंकर वणव्यांतहि सुरक्षित राहिला होता. मात्र हें रहस्य त्याला स्वतःला माहीत नव्हतें.

आगींत जळून मरण्याचाहि उपाय उपयोगीं पडत नाहीं असें पाहून अखेर पर्वताच्या कड्यावरून उडी टाकून आपल्या जीवाचा शेवट करावा असें अविमारकानें ठरविलें. त्याप्रमाणें त्यानें जवळच्याच तळ्यांत स्नान वगैरे उरकलें व तो उडी टाकण्यासाठीं त्या पर्वताच्या कड्यावर येऊन उभा राहिला. इतक्यांत आकाशांतून चाललेलें विद्याधराचें एक जोडपें विश्रांतिसाठीं त्या शिखरावर येऊन उतरलें.

त्या विद्याधराचें नांव होतें मेघनाद आणि त्याच्या पत्नीचें नांव होतें सौदामिनी. तीं दोघें हिमालयावरून निघून मलय पर्वतावर विद्याधरांचा एक उत्सव व्हावयाचा होता तिकडे निघालीं होतीं.

त्या पर्वताच्या शिखरावर येतांच तेथें अगोदरच उभ्या असलेल्या अविमारकाकडे मेघनादाचें लक्ष गेलें. त्यानें अविमारकाच्या रूपाकडे पाहून लगेच ओळखलें कीं हा कोणी-तरी मंत्रभ्रष्ट विद्याधरच असला पाहिजे. त्यानें मग उघड-पणें अविमारकाला विचारलें कीं, तूं कोण, यावेळीं येथें कशासाठीं आला आहेत ? परंतु अविमारक आपली खरी हकीकत सांगण्याचें टाळूं लागला. तेव्हां मेघनादानें अंतर्ज्ञानानेंच जाणलें कीं, हा अग्निपुत्र असून याची जाणीव याला स्वतःला मात्र नाहीं. तसेंच त्याला हेंहि समजून आलें कीं, कुंतिभोजाची मुलगी कुरंगी हिच्याशीं याचा गुप्त प्रेमसंबंध आहे, परंतु तो उघडकीस आल्यामुळें दुःखानें हा आत्महत्त्या करावयास तयार झाला आहे. कुरंगीचीहि तिकडे विरहानें अशीच अवस्था झालेली आहे, हेंहि त्या विद्याधराला कळलें.

अविमारक हा खरा विद्याधरच असल्यामुळें अशा संकटकाळांत त्याला साहाय्य करणें आपलें कर्तव्य आहे असें मेघनादानें मनाशीं ठरविलें. त्यानें अविमारकाला

त्याची खरी हकीकत आपल्याला कळली असल्याचें सांगितलें. अविमारकालाहि मग तें कबूल करण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं.

विद्याधरानें त्याला पुन्हां राजवाड्यांत प्रवेश करतां येईल अशी व्यवस्था करून देण्याचें ठरविलें. अर्थातच अविमारकाला पुन्हां उघडपणें राजवाड्यांत जाऊन कुरंगीला भेटणें शक्य नव्हतें. म्हणून विद्याधरानें त्याला आपल्याजवळची एक अंगठी दिली. त्या अंगठीचा गुण असा होता कीं तीं उजव्या हाताच्या बोटांत घातली म्हणजे घालणारा माणूस अदृश्य होई आणि तीच काढून डाव्या हाताच्या बोटांत घातली म्हणजे तो पुन्हां पहिल्या-प्रमाणें इतरांना दिसूं लागे. तसेंच उजव्या हाताच्या बोटांत अंगठी घालून अदृश्य होणाऱ्या माणसानें ज्याला हात लावला असेल तो आणि त्यानेंहि ज्यांना ज्यांना स्पर्श केला असेल ते असे सर्वजणच त्या अंगठीच्या प्रभावानें अदृश्य होत.

ती अद्भुत अंगठी मिळाल्यानें अविमारकाला अर्थातच फार हर्ष झाला आणि तो आपल्या प्रियेच्या भेटीसाठीं लगबगीनें निघाला. पण त्याला अजूनहि एका अडचणींतून जावयाचें होतें.

अविमारकाचें कन्यामहालांतील गुपीत उघडकीला आल्यामुळें तो तेथून चालता झाला. परंतु पुढें त्याचें काय झालें तें कोणालाच कळलें नव्हतें. राजवाड्यांत कांहीं बरावाईट प्रसंग न घडतां तो तेथून सुखरूप निसटला एवढी माहिती त्याचा मित्र विदूषक संतुष्ट याला मिळाली होती. संतुष्टाचें अविमारकावर अतिशय प्रेम होतें,त्यामुळें तो नाहींसा झाल्याचें समजल्यापासून त्याला चैन पडत नव्हतें. तेव्हां त्यानें आपल्या मित्राचा तपास लावण्याचें ठरविलें व तोहि नगराबाहेर पडला.

हिंडतां हिंडतां विदूषक संतुष्ट फार थकला व विसांवा घेण्यासाठीं म्हणून एका झाडाखालीं सांवलीला लवंडला. योगायोगानें अविमारकहि नगरींत परतण्याच्या उद्देशानें त्या पर्वतावरून खालीं येत असतांना त्या झाडाजवळ येऊन पोहोंचला. तोंच त्याला तेथें आपला मित्र संतुष्ट झोंपला असल्याचें आढळलें. संतुष्टहि तेवढ्यांत जागा झाला. दोघे मित्र एकमेकांना मोठ्या प्रेमानें भेटले.

संतुष्टानें साहजिकच त्याला विचारलें कीं, तूं इतके दिवस कोठें होतास ? काय केलेंस ? तेव्हां अविमारकानें त्या विद्याधराची सर्व हकीकत सांगून ती अद्‌भुत प्रभावी अंगठीहि त्याला दाखविली. मग दोघेहि लगबगीनें नगराकडे निघाले व लवकरच राजवाड्यापाशीं येऊन पोहोंचले.

पूर्वी याच राजवाड्यांत रात्रींच्या वेळीं मोठें साहस पत्करून जीव मुठींत धरूनच अविमारकानें प्रवेश केलेला होता. परंतु आज मात्र सज्जनांच्या सभेंत एकाद्या पंडितानें प्रवेश करावा तसा तो या अद्‌भुत अंगठीच्या प्रभावानें दिवसाढवळ्या त्या राजवाड्यांत जात होता. त्यामुळें त्याला अगदीं कृतार्थ झाल्यासारखें वाटत होतें.

अविमारक तेथून कन्यामहालाकडे निघाला. संतुष्टहि त्याचा हात धरून त्याच्याबरोबर होताच. अंगठीच्या प्रभावामुळें ते कोणाला दिसत नव्हते, त्यामुळें ते कोणताहि अडथळा न येतां कुरंगी आपली सखी नलिनिका हिच्यासह गच्चीवर बसली होती तिथपर्यंत जाऊन पोहोंचले.

अविमारकाच्या विरहानें कुरंगीचें मन कशांतच लागत नव्हतें. ती शरीरानेंहि अगदीं हडकून गेली होती. अविमारक पुन्हां आपल्याला भेटेल ही आशा तिनें आतां सोडून दिली होती आणि त्यामुळें ती आत्महत्त्या करण्याच्या विचारांत होती. म्हणून तिनें कांहींना कांहीं निमित्त काढून आपल्या सर्व दासींना तेथून दुसरीकडे पाठवून दिलें आणि पावसाच्या पाण्यानें स्नान करावयाचें आहे असें म्हणून गच्चीचें दार लावून घेतलें.

अविमारक व संतुष्ट अदृश्य असल्यानें ते दोघे कांहीं तिला दिसून आले नाहींत. त्या दोघांना मात्र ती दिसत होती. थोड्याच वेळांत तिनें आपल्या अंगावर घेण्याच्या वस्त्राचा गळफांस लावला तेव्हां तें त्यांना दिसलें. इतक्यांत मोठा गडगडाट झाल्यामुळें ती घाबरून खालीं पडली आणि 'वांचवा', 'वांचवा' म्हणून ओरडूं लागली. मग मात्र बाजूला उभें राहणें अविमारकाला शक्य नव्हतें.

त्यानें झटकन ती अंगठी उजव्या हाताच्या बोटांतून काढून डाव्या हाताच्या बोटांत घातली व पुढें होऊन त्यानें कुरंगीला उठविलें. अविमारक भेटल्यामुळें तिला आतां दुःखाचेंहि कारण उरलें नाहीं. परंतु अजून त्या दोघांचें रीतसर लग्न लागावयाचें होतें आणि तोंपर्यंत लपून छपूनच सारा कारभार करणें भाग होतें.

लवकरच काशिराजाचा मुलगा जयवर्मा कुंतिभोज नगरींत येऊन दाखल झाला. त्याच्याबरोबर त्याची आई सुदर्शनाहि आलेली होती. सौवीरराजपुत्र विष्णुसेनाचा पत्ता लागत नसल्यामुळें अखेर कुंतीभोजानें आपली आवडती कन्या जयवर्म्याला द्यावयाचें ठरविलें. या विवाहसमारंभा-साठींच राजानें अमात्य भूतिक याला काशिराजाकडे पाठवून जयवर्म्याला मोठ्या समारंभानें तेथें आणविलें होतें.

स्वतः काशिराजानें मात्र यज्ञ-दीक्षा घेतली असल्यामुळें तो आला नव्हता.

ज्योतिषानें जयवर्मा तेथें आला त्याच दिवसाचा मुहूर्त विवाहासाठीं धरला. त्यामुळें सगळीकडे राजकन्येच्या विवाहाचीच गडबड उडालेली होती. मात्र कुंतिभोजाच्या राणीला हा विवाह पसंत नव्हता. सौवीर हें तिचें माहेर. त्यामुळें त्या घराण्यांतील विष्णुसेनालाच आपली मुलगी देऊन माहेराचा संबंध दृढ करावा अशी तिची इच्छा होती. परंतु विष्णुसेनाचा तर कांहीं पत्ता लागत नव्हता. त्यामुळें राणीला चैन नव्हतें आणि तिच्या या स्थितीमुळें कुंतिभोज राजाहि खिन्न झाला होता. सौवीर-राजाशीं त्याची फार मैत्री असल्यामुळें तो आपल्या मुलासह नाहीसा झाल्याचें ऐकून त्याच्या या खिन्नतेंत भरच पडली होती.

इतक्यांत सौवीरच्या मंत्र्याकडून पत्र घेऊन एक दूत आला. त्या पत्रानें सौवीरच्या मंत्र्यांनीं कुंतिभोजाला कळविलें होतें कीं, 'सौवीरराज आपली राणी व राजपुत्र यांसह कुंतिभोज नगरांतच गुप्तपणानें राहात आहेत, असें आमच्या हेरांकडून आम्हांला समजलें आहे, तरी त्याची आपण दखल घ्यावी.'

ही माहिती मिळतांच कुंतिभोज स्वतः अमात्य भूतिकाला बरोबर घेऊन सौवीरराजाच्या तपासासाठीं निघाला. लवकरच त्याला त्याचा ठावठिकाण समजलाहि. तेव्हां मग कुंतिभोज सौवीरराजाला मोठ्या सन्मानानें आपल्या-बरोबर घेऊन राजवाड्यांत परत आला. सौवीरराजानें आपल्याला झालेल्या शापाची हकीकत कुंतिभोजाला सांगितली. परंतु विष्णुसेन कोठें होता ?

विष्णुसेन कोठें निघून गेला हें कोणालाच माहीत नव्हतें. सौवीरराजालाहि तें ठाऊक नव्हतें. विष्णुसेन नाहींसा झाला त्याला एक वर्ष उलटून गेलें होतें. त्यामुळें सौवीर-राज त्याच दुःखांत चूर होता. वास्तविक शापाची मुदत संपल्यानें चांडाळपणांत राहाण्याचे त्याचे कष्ट आतां संपलेले होते. परंतु मुलगा नाहींसा झाल्याचें दुःख मात्र कायमच होतें. त्यामुळें त्यानें कुंतिभोजाला विचारलें कीं अविमारकाविषयीं आपल्याला कांहीं माहिती आहे का ?

परंतु ती माहिती कुंतिभोजानें देण्याऐवजीं दुसऱ्याच एका व्यक्तीनें दिली. सौवीरराज आपली सर्व हकीकत सांगून पुरी करीत आहे तोंच देवर्षि नारद तेथें येऊन पोहोंचले. अर्घ्यपाद्यादिकांनीं कुंतिभोजानें त्यांची यथाविधि पूजा केल्यावर नारदांनीं आपल्या येण्याचें कारण सांगितलें. ते म्हणाले, " अविमारक नापत्ता झाल्यामुळें तुम्ही दुःखी

आहांत असें मला समजलें. तुमचें तें दुःख नाहींसें करण्याच्या उद्देशानेंच मी आज येथें आलों आहें."

अर्थातच नारदाचें हें बोलणें ऐकून दोघांहि राजांना आनंद झाला. मग नारदानें अविमारकाची सर्व हकीकत हळुहळु प्रकट करून त्याचा कुरंगीशीं अगोदरच विवाह झालेला आहे असें सांगून टाकलें. परंतु या नव्या माहितीमुळें कुंतिभोज मोठ्या पेंचांत पडला. कारण त्यानें कुरंगी जयवर्म्याला देण्याचें वचन सुदर्शनेला अगोदरच देऊन टाकलेलें होतें. परंतु नारदांनीं त्याहि अडचणींतून त्याला वाट काढून दिली.

नारदांना सुदर्शनेचें एक गुपीत माहीत होतें. सुदर्शना व सौवीरराजाची राणी सुचेतना या दोघी बहिणी बहिणी होत्या. त्या दोघीहि एकाच वेळीं बाळंत झाल्या. दोघींनाहि मुलगेच झाले; पण दुर्दैवानें सुचेतनेचा मुलगा जन्मतांच मेला. त्यामुळें सुदर्शनेनें आपला मुलगा बहिणीला देऊन तिचें सांत्वन केलें. तो मुलगा म्हणजेच विष्णुसेन आणि त्याचेंच नांव पुढें अविमारक पडलें. हें रहस्य उघड करतांच सुदर्शनेनेंहि कुरंगीचा विष्णुसेनाशीं विवाह होण्यास संमति दिली. तेव्हां नारदांनीं आणखी असें सुचविलें कीं, कुरंगी जयवर्म्यापेक्षां वयानें मोठी असल्यामुळें त्यांचा विवाह होणें योग्यहि नव्हतें. तेव्हां कुरंगीची बहीण

सुमित्रा ही जयवर्म्याला देऊन काशिराजाशीं स्नेह राखावा. तें सर्वांना मान्य झालें.

मग अविमारक आणि कुरंगी यांचा थाटांत विवाह पार पडला. आणि कुंतिभोजानें सौवीरराजाला त्याच्या सर्व परिवारासह मोठ्या सन्मानानें परत पाठविलें.

अनुक्रम २०९५०
विभाग ८२८
क्रमांक
नों. दि. २५
वाचनालय

IRBK-0105767
IRBK-0105767

## पहिली अखंड भरारी (The Spirit of St. Louis)

अनु. : शं. ल. चिटणीस — चार्ल्स लिंडबर्ग

न्यूयॉर्क ते पॅरिस अखंड विमान-भरारीची ती रोमांचकारी सत्यकथा स्वत: वैमानिकच सांगत आहे. रु. १-८-०

## अणूची कथा (Report on the Atom)

अनु. : प्रा. एम. पी. जंगी — गॉर्डन इव्हॅन्स डीन

अणुयुगाच्या पहिल्या दहा वर्षांचा हा आढावा सामान्य माणसालाहि अणूचें यथार्थ-दर्शन घडवील. रु. १-८-०

## महान परिवर्तन (The Big Change)

अनु. : शं. ल. चिटणीस — फ्रेड्रीक ल्युइस ॲलन

अमेरिकेच्या जीवनांत केवढें हें विलक्षण स्थित्यंतर चालू शतकाच्या पूर्वार्धांत घडून आलें आहे ! रु. १-८-०

## ॲब्राहम लिंकन (Abraham Lincoln)

अनु. : गोपाळराव कुलकर्णी — एमिल लुड्विग

मुक्त झालेल्या गुलामांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहिले. त्यासाठींच लिंकन जगला व हुतात्मा झाला. रु. १-८-०

## वादळ (Storm)

अनु. : प्रा. य. ग. नाईक — जॉर्ज स्टुअर्ट

ही आकर्षक हकीकत एका काल्पनिक वादळाची खरी पण कादंबरीइतकीच चटकदार ! रु. १-८-०

वोरा ॲन्ड कं., पब्लिशर्स, प्रायव्हेट लि., मुंबई-२.

ग्र. सं.
क्र. ५७९५
दि.